इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (२/२०२६)
स्थायी समिती सभा

---

प्रति.                                                                                     दिनांक- १७/०४/२०२६

मा. ----------------------------------------------------------------
स्थायी समिती सदस्य / सदस्या,
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिका मा. स्थायी समिती सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिका स्थायी समितीची सभा सोमवार दि.२०/०४/२०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील स्थायी समिती सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

Satish

( सतिश वसंतराव मुळीक )
सभापती,
स्थायी समिती

*****************************************************************************

**परिशिष्ठ**

विषय क्र. १ : मागील सभा दि. ०२/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

विषय क्र. २ : आरोग्य विभागाकडील वॉर्ड क्र.१ ते २६ मधिल सारण गटर काढणे, मृत जनावरे उचलणे, तसेच शहरातील रस्त्यालगत साईडपट्टी मारणे तसेच विविध ठिकाणी गटारीवर असलेले नळे बदलून व्यवस्थित करणे, मा.सदस्य यांचे सूचनेनुसार भागातील स्वच्छता करुन देणे , नदी घाटावरील स्वच्छता करणे अशा विविध कामांसाठी मक्तेदार - जोतिराम बरगे यांचेकडून भाडे तत्वावर घेणेत आलेल्या जे.सी.बी. ची मुदत २६/०२/२०२६ रोजी संपली असलेने मुदत संपले तारेखेपासून मक्तेदार यांना मुळ मंजुर दरात मुदतवाढ देणेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

विषय क्र. ३ : मा.सभापती यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०३
दि. २०/०४/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. ०२/०४/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

मागील दि. ०२/०४/२०२६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : र. आ. रजपुते.

अनुमोदक : नि. कि. जोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०४
दि. २०/०४/२०२६

विषय क्र. २ : आरोग्य विभागाकडील वॉर्ड क्र.१ ते २६ मधिल सारण गटर काढणे, मृत जनावरे उचलणे, तसेच शहरातील रस्त्यालगत साईडपट्टी मारणे तसेच विविध ठिकाणी गटारीवर असलेले नळे बदलून व्यवस्थित करणे, मा.सदस्य यांचे सूचनेनुसार भागातील स्वच्छता करुन देणे , नदी घाटावरील स्वच्छता करणे अशा विविध कामांसाठी मक्तेदार - जोतिराम बरगे यांचेकडून भाडे तत्वावर घेणेत आलेल्या जे.सी.बी. ची मुदत २६/०२/२०२६ रोजी संपली असलेने मुदत संपले तारेखेपासून मक्तेदार यांना मुळ मंजुर दरात मुदतवाढ देणेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील १ ते २६ वॉर्डमधील कच्च्या सारण गटारींची स्वच्छता करणे, रि.स.नं. ६३८, कचराडेपोवर दैनंदिन येणाऱ्या ट्रॅक्टर, कॉम्पॅक्टर यांना रस्ता करून देणे, मृत जनावरे उचलणे, मृत जनावरांची विल्हेवाट लावणेसाठी कचराडेपोवर चर पाडणे, काळ्या ओढयाची स्वच्छता करणे, तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस पडलेले बांधकाम व पाडकामाचे साहित्य उचलणेकामी जे.सी.बी.ची आवश्यकता असलेबाबत मुख्य स्वच्छता निरीक्षक तसेच प्रशासकीय वॉर्ड नं.१ ते २६ मधील संबंधित स्वच्छता निरीक्षक यांचे अहवाल इकडे प्राप्त झालेले होते .

याकामी या कार्यालयाकडून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करणेत येवून वार्षिक १५०० तास JCB भाड्याने घेणेचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यानुसार निविदा मागविणेत आलेली होती. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१) अंदाजपत्रकिय र. रु २३,७४,०००/- ( मा.आयुक्त तथा प्रशासक यांची दि.१७/०७/२०२३ ने प्रशासकीय व आर्थिक मंजुरी )

२) तांत्रिक मंजूरी र. रु २२,६०,९८०/- (अध्यक्ष ,तांत्रिक मान्यता समिती तथा शहर अभियंता इ.म.न.पा. दि. २७/०९/२०२३ ने )

३) प्राप्त निविदा दर estimate दरापेक्षा शेकडा ४६.९९० % कमीने प्राप्त

४) मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे दिनांक;-१५/०३/२०२४ चे आदेशाने निविदा मंजूर (जा.क्र./ इमपा / आरोग्य / आ.का./०२/४७४/२०२४ दि.१५/०३/२०२४ )

५) मूळ कार्यादेश दिनांक ;- १५/०३/२०२४ (१५०० तास)- जा.क्र./इमपा / आरोग्य / १९०३/२०२४ दि.१५/०३/२०२४

६) पहिली मुदतवाढ - मा. प्रशासक ठराव क्र. ११८/२०२५ (मा.महासभा ) दि.२६/०३/२०२५ ने मंजूरी कार्यादेश दिनाक - जा.क्र. इ.म.न.पा./आरोग्य / २६५/१/२०२५ दि.२६/०३/२०२५ ने (१५०० तास)

७) दुसरी मुदतवाढ - मा. प्रशासक ठराव क्र.८३/२०२५ (मा.महासभा ) दि.१२/ ११ /२०२५ ने मंजूरी कार्यादेश दिनाक - जा.क्र. इ.म.न.पा./आरोग्य /९२३//१/२०२५ दिनांक २०/११/२०२५ ने (१००० तास)

वरील प्रमाणे दिले मूळ कार्यादेश व मुदतवाढीचे कार्यादेशानुसार दिनांक ;-१५/०३/२०२४ पासून ४००० तास कामाचे कार्यादेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे दिनांक ;-१६/०३/२०२४ ते दिनांक ;-२०/०१/२०२६ अखेर ३५३९ तास २५ मिनिटे एवढ्या तासाचे काम झालेले दिसून येते. व उर्वरित राहिलेले कामाचे तास दिनांक;-२६/०२/२०२६ रोजी संपलेले आहेत.

मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी मागणी केले प्रमाणे तसेच महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्य यांचे कडून प्रभागातील कामा संबधित कच्या सारण गटारी पावसाळ्यापूर्वी स्वच्छ करणेबाबत मागणी होत असलेने नवीन निविदा प्रक्रिया करणेस बराच कालावधी लागू शकतो म्हणून यापूर्वी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील विविध कामे करणेकरिता JCB भाड्याने घेणे हे काम मक्तेदार श्री.जोतिराम लखू बरगे यांना मंजूर आहे. श्री.बरगे यांना या पूर्वी मा.प्रशासक ठराव क्र.८३/२०२५ (मा.महासभा) दि. १२/११/२०२५ ने १००० तासाची मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर कामाची मुदत दि. ३१/०३/२०२६ अखेर कालावधीसाठी देणेत आलेली होती.

तथापि या विभागाकडील कामाचा व्याप पाहता सदरचे तास हे त्यापूर्वीच म्हणजे दि. २६/०२/२०२६ रोजी संपलेले आहेत.आता JCB कामाची आवश्यकता पाहता जा.क्र:- इ.म.न.पा./घनकचरा व्य.विभाग./१५१/२०२६ दि. ११/०३/२०२६ ने श्री.बरगे यांना पत्र देवून " सध्या पावसाळ्यापुर्वी जे.सी.बी. ने ओढे-नाले साफसफाई करणे, मोठ्या सारण गटारी साफसफाई करणेची महानगरपालिकेस आवश्यकता असलेने आपण यापूर्वी दिले निविदा मंजूरी आदेशाप्रमाणे पुर्वी मंजूर असलेल्या दरामध्येच आणखी १५०० तास जे.बी. भाड्याने देणेस तयार आहात का? याबाबत आपण लेखी म्हणणे सत्वर उलटटपाली इकडे कळवावे " अशी विचारणा करणेत आलेली होती. त्या पत्रास अनुसरून श्री.बरगे यांनी जावक क्र.१/६६ दि:- ११ /०३/२०२६ ने

Scanned with OKEN Scanner

"सदर काम मी ४६.९९% कमी दराने करणेस तयार आहे. पण सध्या जगात अमेरिका, ईरान ,एस्त्राईल युद्ध चालू आहे. त्याचा परिणाम म्हणून डिझेल वाढ झाली तरी मला पूर्वी पेक्षा दर वाढ नाही झाली तर मी पूर्वीच्या दरात म्हणजेच ४६.९९% कमी दारात करून देणेस तयार आहे. तरी मला मुदतवाढ व दर वाढ द्यावी ही विनंती " असे नमूद करून पत्रं दिलेले आहे.

सबब इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १ ते २६ वॉर्डमधील कच्ची सारण गटर स्वच्छता करणे, मोठ्या बांधीव सारण गटर स्वच्छता करणे, मृत जनावरांची विल्हेवाट लावणेसाठी कचराडेपोवर चर मारणे, काळा ओढा स्वच्छता करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूस पडलेले बांधकाम व पाडकामाचे साहित्य उलचणे, पावसाळ्याच्या दिवसात सखल भागात पाणी साचून राहते अशाठिकाणी चर मारणे अशी विविध कामे करणेकामी JCB ची आवश्यकता भासते. त्यामुळे मक्तेदार जोतीराम लखू बरगे यांना, त्यांचे मूळ मंजूर निविदा दरात पुढील १५०० तासाकरिता मुदतवाढ देणे उचित होणार आहे. तरी यापूर्वीचे मुदतवाढ दिले १००० तासांचे काम संपले पासून (दि.२६/०२/२०२६ पासून ) पुन्हा १५०० तास मुदतवाढ देणे या कामास स्थायी समितीच्या मान्यतेस्तव कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेले १५०० तास मुदतवाढ ऐवजी महानगरपालिकेने नविन JCB खरेदी करणेकामी कार्यवाही सुरु केली आहे. सदर JCB प्राप्त होई पर्यंतच्या मुदतीकरीता (दि.२६/०२/२०२६ पासून ) मक्तेदार जोतीराम लखु बरगे यांना मुदतवाढ देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती